श्री.मिलींद कचरु कांबळे, आरोग्य पर्यवेक्षक, पंचायत समिती शेवगांव यांचे स्वेच्छा सेवानिवृती मंजूर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. आरोग्य/आस्था-३/ ५७ /२०२६
अहिल्यानगर, दिनांक- ३० /०१/२०२६

संदर्भ :- १.गट विकास अधिकारी, पंचायत समिती शेवगांव यांचेकडील पत्र क्र. वशि/आस्था-१/८२९/२०२५, दिनांक- १७/१०/२०२५
२.श्री.मिलींद कचरु कांबळे, आरोग्य पर्यवेक्षक, यांचा विनंती अर्ज दिनांक- ०१/१०/२०२५
३.या कार्यालयाकडील पत्र क्र. आरोग्य/आस्था-३/१००१/२०२५, दिनांक- २३/१२/२०२५
४.गटविकास अधिकारी पंचायत समिती शेवगांव यांचेकडील पत्र क्र.वशि/आस्था/७५/२६ . दिनांक- २०/०१/२०२६
५.महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ नियम ६५
६.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे कडील अधिकार प्रदान आदेश क्र. साप्रवि१/रवका/६९६/१६ दिनांक- १७/०६/२०१६

ज्याअर्थी, श्री.मिलींद कचरु कांबळे, आरोग्य पर्यवेक्षक, पंचायत समिती शेवगांव यांनी दिनांक- ०१/१०/२०२५ च्या अर्जानुसार संदर्भ क्र.१ अन्वये कार्यालय प्रमुखामार्फत स्वेच्छा सेवा निवृत्ती करणेबाबत विनंती केलेली आहे. श्री.मिलींद कचरु कांबळे, आरोग्य पर्यवेक्षक, यांचेविरुध्द ना देय ना चौकशी दाखले कार्यालय प्रमुखामार्फत प्रमाणीत करुन या कार्यालयास सादर केलेले आहेत. परंतु भविष्यकाळात लेखा परिक्षणामध्ये अगर इतर तपासणीमध्ये त्यांचेकडेस कोणतीही वसुली निघाल्यास अशी वसुली त्यांचेवर / त्यांचे कायदेशीर वारसांवर भरणे बंधनकारक राहील. श्री.मिलींद कचरु कांबळे, आरोग्य पर्यवेक्षक, यांची ऐच्छिक सेवानिवृत्ती मंजुरी करणेकामी नियुक्ती प्राधिकारी हे सक्षम प्राधिकारी आहेत.

त्याअर्थी, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी संदर्भ क्र.६ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन त्यांची झालेली सेवा लक्षात घेता. मी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-१ जिल्हा परिषद अहिल्यानगर, या आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ च्या नियम ६५ नुसार श्री.मिलींद कचरु कांबळे, आरोग्य पर्यवेक्षक, यांना दिनांक- ३१/०१/२०२६ रोजी मध्यान्होत्तर पासून आरोग्य पर्यवेक्षक या पदावरून स्वेच्छा सेवानिवृत्त करित आहे. तरी सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक 202601301000015 असा आहे.

(राहुल शेळके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.मिलींद कचरु कांबळे, आरोग्य पर्यवेक्षक,

द्वारा व प्रतः- गट विकास अधिकारी, पंचायत समिती शेवगांव, ता.शेवगांव, जि.अहिल्यानगर

२/- सोबत आदेशाच्या दोन प्रती पाठविलेल्या आहेत. संबंधीतास एक प्रत बजावुन दुसऱ्या प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी. श्री.मिलींद कचरु कांबळे, आरोग्य पर्यवेक्षक, यांना दिनांक- ३१/०१/२०२६ रोजी मध्यान्होत्तर पासून स्वेच्छा सेवा निवृत्त करणे कामी जरुर ती कार्यवाही करावी. तसेच अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस को ऑप क्रेडीट सोसायटी लि. अहिल्यानगर यांचे रक्कम रु. ११,३१,०००/- कर्जाचे मुद्दल व व्याज प्रलंबित असुन सदर कर्जाची रक्कम श्री.कांबळे यांना देय असलेल्या उपदानातुन वसुल करावी. व त्यांना देय असलेल्या सेवानिवृत्ती लाभासंबंधीत प्रकरणे तात्काळ सादर करणेची दक्षता घ्यावी. तसा अहवाल इकडेस सादर करावा.

(राहुल शेळके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत - आरोग्य/पेन्शन कार्यासन